महाराष्ट्र शासन
रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु),
अधिष्ठाता यांचे कार्यालय, डॉ. ॲनीबेझंट रोड,वरळी, मुंबई ४०० ०१८.
०२२ - २४९३४२१४ फॅक्स . . ०२२ - २४९३६८८१
(website :- www.ayurvedinstitute.com, email :- deanrapmc@gmail.com)

---

जा.क्र. राआपोम/भांडार/जिवायो २४-२५/२०२४ / 6478 दिनांक :- 06 SEP 2024

**जाहिरात/Notice for Quotation**

प्रति,

....................................

....................................

....................................

विषय:- **दरपत्रक ( Quotation ) सादर करणेबाबत**
महाविद्यालयातील अभिलेख्यांचे Scanning आणि Digitization करण्याकरीता दरपत्रक सादर करणेबाबत.

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, जिल्हा वार्षिक योजना २०२४-२५ अंतर्गत मंजूर नियतव्ययातून महाविद्यालयातील अभिलेख्यांचे Scanning आणि Digitization करण्याकरीता दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

आपणांस सूचित करण्यात येते की, महाविद्यालयातील अभिलेख्यांचे Scanning आणि Digitization करण्याकरीता खालील नमूद केलेल्या निर्दिष्टानुसार दरपत्रक सादर करणेकरीता कमीत कमी दराची मोहोरबंद पाकिटातील दरपत्रके दिनांक २०.०९.२०२४ रोजी सायं ५.०० वाजेपर्यंत पोहचतील अशा बेताने अधिष्ठाता यांचे कार्यालयात खालील नमूद अटी व शर्ती यांच्या अधिन राहून सादर करण्यात यावीत.

ANNEXURE - A

| अ.क्र. | कामाचे व विनिदिष्टे |
|---|---|
| 1 | Scanning data digitation, scanning per image and indexing QC, Make a PDF file and upload in Hard Disk.<br>1. A4 & Legal good condition paper scanning<br>2. A4 & Legal damage condition paper scanning<br>3. A3 Size Sheet Paper scanning<br><br>All Machinary provide by Vendor. Only place and electricity provide by office. |

## अटी व शर्ती

१. दिनांक २०.०९.२०२४ रोजी सांय ५.०० वाजल्यानंतर प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

२. दरपत्रक सादर करताना अशा प्रकारच्या खरेदीवर शासनाकडून आकारले जाणारे विविध कर (taxes) स्वतंत्रपणे नमूद करावेत.

३. दरपत्रक सादर करतेवेळी साधनसामुग्री पुरवठा करणेसाठी आपले काही शुल्क/दर असल्यास ते देखिल स्वतंत्रपणे नमूद करावेत.

४. दरपत्रक सादर करताना GST क्रमांक नमूद असलेल्या लेटरहेडवर सादर करावे.

५. दरपत्रक सादर करणा-या दरपत्रकधारकाचा किंवा संस्थेचा दरपत्रक प्रक्रियेत भाग घेणा-या अन्य संस्थेमध्ये थेट स्वारस्य असू नये, तसे आढळल्यास दोन्ही किंवा अधिक दरपत्रके नाकारण्यात येतील. याकरीता सोबत जोडण्यात आलेली हमीपत्र दरपत्रकधारकास सादर करणे बंधनकारक राहील. **(हमी पत्र विहीत नमुन्यात सादर करावे)**

६. दरपत्रक धारकांनी केवळ एकच दरपत्रक सादर करावे. दरपत्रक सादर केलेल्या दरपत्रकधारकाचा दरपत्रक प्रक्रियेत भाग घेतलेल्या इतर संस्थासोबत प्रत्यक्ष/अप्रत्सक्ष संबध वा सहभाग नसावा. आढळल्यास दरपत्रक नाकारण्यात येतील.

७. साधनसामुग्री खरेदी प्रश्नात साधनसामुग्री करीता देण्यात येणारा हमी कालावधी ( Warranty Period) ठळकपणे नमूद करावा.

८. दरपत्रक सादर करतेवेळी मोहोरबंद/सीलबंद पाकिटांवर **"** महाविद्यालयातील अभिलेख्यांचे Scanning आणि Digitization **करीताचे दरपत्रक"** असे स्पष्टपणे नमूद करावे.

९. खरेदी प्रक्रिया, यशस्वी दरपत्रक स्विकारणाच्या पूर्वी किंवा यशस्वी दरपत्रक स्विकारण्यात आल्यानंतर देखिल कोणत्याही वेळी लेखी नमूद करावयाच्या कारणांमुळे रदद करण्याचे अधिकार हे कार्यालय राखून ठेवीत आहे.

१०. विहीत कालावधीत प्राप्त दरपत्रके दिनांक २३.०९.२०२४ रोजी स. ११.०० वा. अधिष्ठाता यांचे दालनात उघडण्यात येतील त्यावेळी कंपनीच्या एका प्रतिनिधीस स्वखर्चाने हजर राहण्याची मुभा राहील.

११. पुरवठादाराने सदर खरेदी संदर्भातील आवश्यक माहिती यासोबतच्या प्रपत्रात **(Annexure – B)** मध्ये सादर करावी.

१२. सदर जुने अभिलेखे स्कॅनिंग करण्याकरिता आपली सेवा समाधानकारक न राहिल्यास आपले आदेश रदद रदद करण्यात येतील.

१३. खरेदी प्रक्रियेच्या अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल करण्याचा अधिकार अधिष्ठाता, रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.), वरळी, मुंबई हे राखून ठेवत आहेत.

( वैद्या संपदा सं. संत, )
अधिष्ठाता
रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय(आयु),
वरळी, मुंबई १८.

प्रत,
महाविद्यालयीन सुचना फलक

## Annexure – B

कंपनीच्या लेटरहेडवर खालील नमूद तपशिलाप्रमाणे माहिती भरणे

प्रति,
अधिष्ठाता,
रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.),
वरळी, मुंबई -१८

**जिल्हा वार्षिक योजना २०२४-२५ ( Scanning & Digitization साधनसामुग्री )**

............................................................ महाविद्यालयातील अभिलेख्यांचे Scanning आणि Digitization दरपत्रक

| अ.क्र. | तपशिल | आवश्यक माहिती वा प्रमाणपत्रे जोडण्यात आलेली आहेत किंवा कसे |
|---|---|---|
| १ | पुरवठादाराचे नाव | |
| २ | कंपनीचा पत्ता, दुरध्ववी ई-मेल आयडीसहित | |
| ३ | कंपनीचा नोंदणी क्रमांक ( Registration No.) | |
| ४ | विर्निर्दिष्टे ( सोबत जोडण्यात आलेल्या सहपत्रानुसार) | |
| ५ | GST No. | |
| ६ | शासनाचे कर | |
| ७ | इतर कर | |
| ८ | Scanning and Digitization ची सेवा इतर शासकीय/निमशासकीय कार्यालयास पुरवठा केला असल्यास अशा कार्यालयाचे पत्ते व दुरध्वनी क्र. अथवा पुरवठा आदेशांची छायांकित प्रत | |
| ९ | हमी पत्र | |
| १० | इतर अटी व शर्ती असल्यास | |

स्थळ :
दिनांक :

सेवा पुरवठादाराचा अधिकृत स्वाक्षरी व शिक्कांसहित